# राशिभविष्य - एप्रिल, २०१३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

=============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-बुध-हर्षल हे चार ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. शनि व राहू हे दोन ग्रह दांपत्यजीवनातील सुखाचे दृष्टीने प्रतिकुल होतील. केवळ गुरु ग्रहाच्या पूर्ण अनुकुलतेमुळे व काही प्रमाणात शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, कुटुंबात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अपेक्षित प्रगती होईल, कर्ज असल्यास त्याची फ़ेड करणे शक्य होईल व अर्थप्राप्तीत वाढ होत असल्याचा अनुभव येईल. पण सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना मात्र हर्षल, रवि, मंगळ व बुध हे चार ग्रह नैराश्य आणतील. अनारोग्याचा व मानहानीचा त्रास सहन करावा लागेल. शत्रुत्व निर्माण करतील व त्यामुळे मन सतत अस्वस्थ राहील. राशिस्वामी मंगळ असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा मूळ स्वभाव संतापी, हट्टी, मानापमान फ़ार असणारा असा असतो. त्यामुळे अशा विरोधी परिस्थितीत गैरसमजुती, भांडणे, जुन्या दबलेल्या प्रकरणांचा त्रास, श्रम व दगदग यांमुळे त्यांना शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागतो. नोकरी-व्यवसायातही प्रतिकुल परिस्थितीला तोंड द्यावे लागते. या राशीच्या ज्या मंडळीना हृदयविकार, रक्तदाब अशी दुखणी आहेत त्यांनी तर अति विचार करू नये व मन शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. कुसंगतीपासून दूर राहणेच इष्ट होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचे पहिले ११ दिवस बऱ्याच प्रमाणात अनुकुल आहेत. त्यामुळे याच काळात त्यांनी जे काय साधावयाचे ते साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. पण लहरी स्वभाव व नंतरचा संपूर्ण प्रतिकुल काळ परिस्थितीशी मुकाबला करतच व्यतीत करावा लागेल. दिनांक ११-१२ व दिनांक २४-२५-२६ या दिवशी अधिक मनस्ताप होणे संभवते. जपा. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व स्वस्थता लाभेल. दिनांक १२ पासून सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. गैरसमजुतीतून वाद, भांडणे होणे, खर्च वाढणे, अर्थहानी होणे, जुन्या दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा त्रास होणे, त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. मनावर ताबा ठेवून व संयमाने व सहनशीलतेने आचरण करूनच विपरीत काळ व्यतीत करू शकाल. रक्तदाब, हृदयविकार असलेल्यांनी विशेष जपले पाहिजे. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राहील त्यामुळे प्रतिकुल काळावर मात करू शकाल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, साहित्यिकांना, मानसिक रोगतज्न्यांना, द्रव पदार्थ विक्रेत्यांना, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, लोखंड, कोळसा व्यापाऱ्यांना काळ त्यामानाने अनुकुल व लाभदायक होईल. परधर्मीयांशी व्यापारव्यवसाय संबंध असणारांनाही काळ थोडा लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात संततिसुख लाभेल, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल, श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना व उच्च बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ इच्छाआकांक्षा पूर्ण करणारा, लाभदायक व मनोनुकुल घटना घडविणारा असा असल्याचाच अनुभव येईल. कला व कलात्मक

नोकरी-व्यवसाय असणारांना दिनांक १० नंतरचा संपूर्ण काळ, मनोनुकुल घटनांनी भरलेला, कौटुंबिक सुख देणारा, मन:शांती देणारा असल्याचा अनुभव येईल. सामान्य नोकरी असणारांना मात्र कष्ट-परिश्रमानेच अपेक्षित अर्थलाभ करून घ्यावा लागेल. पण काही भाग्यवंत मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. मात्र मित्रांशी वाद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधता येईल. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील. सामाजिक कार्यात रस असणारांनाही काळ अनुकुल होईल. दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांनाही काळ अनुकुल व लाभदायक होईल. मात्र अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान व संततिसुख लाभणे शक्य दिसत नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये व स्वत:स त्रास करून घेऊ नये. काही मंडळीना प्रवासाचे तर काही भाग्यवान मंडळीना परदेशवारीचे योग संभवतात. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शातीसाठी अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना तुलनात्मक दृष्ट्या या महिन्याचा पूर्वार्ध अधिक प्रतिकुल असणार आहे. पण गृहसौख्य, कौटुंबिक सुख व मातृसुख या दृष्टीने संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असाच असेलसे दिसते. तसेच या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल. प्रगतिकारक, लाभदायक होईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या माणसांच्या ओळखी होतील. प्रतिष्ठा वाढेल. पण सामान्य नोकरी असणारांना कामाचा ताण सहन करावा लागण्याची व वरिष्ठांशी भांडणे होण्याची शक्यता दिसते. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे, अडचणी, अडथळे येणे संभवते. या राशीच्या युवकांना काही नवीन उद्योग-व्यवसाय करण्याची ऊर्मी येईल. पण त्यांनी तसा प्रयत्न करू नये. वर्तमान नोकरी-व्यवसायातच टिकून राहावे. कला क्षेत्रातील मंडळीनाही  काळ फ़ारसा अनुकुल नाही. केवळ गुरु ग्रहाच्या अनुकुलतेनेच या राशीच्या मंडळीना काही प्रमाणात सुखसमाधान लाभेल. पाण्याशी संबंधित नोकरी-व्यवसाय असणारांनी सतत सावधानतेने आचरण करावे, कारण जलभय, विषभय आहे. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने काही मंडळीना वाहनसुख मिळेल, तर काही मंडळीना धनलाभ होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल.  नवे मित्र मिळतील. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील व संपन्न होतील. श्रद्धा असेल तर गुरुदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. तसेच दररोज " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण मन:शांती देईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ सर्व प्रकारच्या आरोग्याचे दृष्टीने प्रतिकुल असा असल्याचाच अनुभव येईल. उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतील आणि काहींच्या बाबतीत अपघात भयही संभवते. जपा. शनि-राहूच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या काही युवकांना उत्तम नोकरी लागेलसे दिसते किंवा एखादे नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता वाटते. तरीही शनि-राहू हे दोन्ही ग्रह भावंडविषयक चिंता निर्माण करतील किंवा बंधुसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा दोघांमधील मतभेदांमुळे दाम्पत्यसुखात बाधा निर्माण होईल. जपा. तसेच मुलांपैकी कोणाच्या वाढत जाणाऱ्या आजारपणाकडेही लक्ष द्यावे लागेल. नोकरीत वरिष्ठांशी वाद होणे संभवते. काही मंडळीना हाती घेतलेल्या कार्यात अडचणी, अडथळे येत असल्याचा अनुभव येईल. व त्यामुळे नैराश्य येईल. अशा परिस्थितीत बुध-गुरु-शुक्राच्या  अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल  घटना घडतील  जन्मकुंडलीत

योग असतील तर काहीना अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना भूमिलाभ तर या राशीच्या काही कर्तृत्वसंपन्न मंडळीना मनसन्मानाचे योगही संभवतात. शिक्षणक्षेत्र, शास्त्रीय संशोधनक्षेत्र व अशा व्यवसायांशी संबंधित व्यवसायक्षेत्र असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास टाळा. मनस्ताप सहन करावा लगण्याची शक्यता दिसते. श्रीगणेश व श्रीहनुमान या दैवतांची उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ पर्यंत शनिदेवाच्या साडेसातीच्या काळाशी मुकाबला करावयाचाच आहे. पण या साडेसातीचा २/३ भाग असह्य मनस्ताप देणारा असा व्यतीत झाला असेल तर  आता उर्वरित काळ बऱ्याच प्रमाणात मनोनुकुल अशा घटनांनी भरलेला असाच असेल. असो. या महिन्याच्या काळात शनि-राहूच्या प्रतिकुलतेमुळे कौटुंबिक सुखात व दाम्पत्यजीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा निर्माण होणे संभवते. विशेष करून आर्थिक समस्या त्रस्त करतील. कोर्टप्रकरणे असतील तर मनस्तापात भरच भरच पडेल. स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. भागीदारी व्यापार-व्यवसाय असेल तर त्यात संशयामुळे किंवा कोणी कान फुंकल्यामुळे गैरसमज निर्माण होऊन चालत्या गाड्याला खीळ बसण्याची शक्यताही नाकारता येत नाही. अशा प्रतिकुल परिस्थितीतही गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे महिन्याच्या उत्तरार्धात काही मनोनुकुल घटना घडतील व मनाला उभारी मिळेल. अध्यात्मात मनापासून रस असेल तर गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शक्ती प्राप्त होईल. विकासाच्या नव्या संधी प्राप्त होतील. प्रवासयोग येतील व काहींना कीर्ती-प्रसिद्धी मिळण्याची शक्यताही दिसते. बुध-शुक्राच्या अनुकुलतेनेही नोकरी-व्यवसायात विविध प्रकारचे लाभ होतील व विपरीत परिस्थिती अटोक्यात राहून मनाला मोठा दिलासा मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. परीक्षेत सुयश मिळेल. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीनी आजपर्यंत शनि ग्रहाच्या साडेसातीचा अंदाजे अर्धा काळ व्यतीत केला आहे. अद्याप साडेसातीचा अर्धा काळ बाकी असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत मनावर संयम ठेवून, सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करून उर्वरित काळ व्यतीत केला तर खूपच सुखाचे होईल व शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद लुटता येईल. शनि-राहू-केतूमुळे सर्व प्रकारचे अनारोग्य, नैराश्य. कुटुंबात घडणाऱ्या मनस्ताप देणाऱ्या अपमानास्पद घटना, कोणाचे स्थलांतर, वैवाहिक जीवनात निर्माण होणाऱ्या बाधा अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लगण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-बुध-हर्षल या तीन ग्रहांच्या अनुकुलतेमुळे शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, यांत्रिक-तांत्रिक व्यवसाय असणारांना, औषधविक्रेत्यांना  विविध प्रकारचे लाभ होण्याची शक्यता वाटते. गुरु ग्रह हा शुक्राच्या वृषभ राशीत असल्यामुळे या राशीच्या कला विषयाची आवड असणारांना व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना सुद्धा महिन्याचा पूर्वार्धच अधिक लाभदायक व यशदायक होईल. सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र अति कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होण्यासाठी अटोकाट प्रयत्न करावे लागतील. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील त्यांना अशा प्रकारचा धनलाभ वा वारसाहक्काने धनप्रप्ती होणे संभवते.  सध्या या

राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील झाले असल्यामुळे अध्यात्मिक उपासनेस अनुकुल असेच आहे. त्यामुळे त्यांनी जरूर आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवावे व अत्मोन्नती साधावी. गूढसंशोधन कार्यासही या महिन्याचा काळ अनुकुल होईल. श्रद्धेने हनुमान उपासना करा, नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा म्हणजे विपरीत काळ सुसह्य होईल.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आणि त्यात सध्या शनि ग्रह प्रतिकुल. त्यामुळे शारीरिक अनारोग्य सहन करावे लागेल व सतत मनाविरुद्ध घटना घडत असल्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. कोणाच्या स्थलांतरामुळे, गैरसमजुतीमुळे दुरावा निर्माण होऊन कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी संततिसुख लभेलच याची खात्री वाटत नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळीना उष्णताविकारांचा असह्य त्रास सहन करावा लागेल. रक्तविकार, हृदयविकार असलेल्यांनी अति विचार न करता मन अगदी शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. चोरीमुळे किंवा अन्य कारणाने अर्थहानी होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, वैद्यकीय संशोधन कार्यात रत असणारांना, औषधविक्रेत्यांना, यांत्रिकतांत्रिक उद्योग-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. कला क्षेत्रातील मंडळीना मात्र महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरुमुळे नवे स्नेहसंबंध वा नवे प्रेमसंबंध निर्माण होणे संभवते. विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील आणि काहींचे संपन्नही होतील. प्रवासयोग संभवतात. राहूमुळे शत्रूपासून रक्षण होईल; पण वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व विपरीत काळ व्यतीत करणे सहज शक्य होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धात कशीही परिस्थिती असो त्यात सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही व सतत तक्रारखोर स्वभाव राहील. कुटुंबसदस्यांशी वाद, भांडणे होणे संभवते. असमाधानकारक घटना घडणे संभवते. राहती जागा किंवा स्थावरसंबंधी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे वास्तुसुखही मिळणे अशक्य होईल. पण शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व विपरीत काळ सुसह्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी मन अस्वस्थ राहील, संततीपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या, कोणास झालेला छोटामोठा अपघात, स्वत:चे अनारोग्य अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. पण गुरुच्या अनुकुलतेमुळे स्वत:चे आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही, असे वाटते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी महिन्याच्या उत्तरार्धात अतिशय जपावे. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र, शिक्षणक्षेत्र, वकिली व्यवसाय, शास्त्रीय संशोधनक्षेत्र अशा क्षेत्रांत कार्यरत असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व अर्थलाभदायक जाईल. राहूमुळे या राशीच्या कर्तृत्वसंपन्न मंडळीना नोकरीचे ठिकाणी बढती, अधिकारपद असे काही मिळू शकेल. पण अधिकारपदामुळे वाममार्ग धन सहज मिळणे शक्य होणार असले तरी तो मोह कटाक्षाने टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करता येणे सहज शक्य होईल. या राशीच्या काही

मंडळीना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धा असेल तर दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा, त्यामुळे मोनोकामना पूर्ण होतील.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, उच्च पद, मानाचे स्थान अशापैकी विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. वरिष्ठ कामाची प्रशंसा करतील. धनलाभ किंवा भूमिलाभ होईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात रत असणारांना कठिंणात कठिण प्रश्न सहज सोडविता येणे शक्य होईल. त्यासाठी परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, कोळसा, लोखंड व्यापारी यांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शेतीवाडी व्यवसाय असणाऱ्या या राशीच्या मंडळीना शेतीवाडीपासून भरघोस अर्थलाभ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस व परीक्षेतील अपेक्षित यशास काल अनुकुल होईल. प्रेमसंबंध व स्नेहसंबंध वाढतील. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. खर्चवाढ, आर्थिक चिंता, राहत्या जागेची समस्या, स्थावरसंबंधी समस्या अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. कोणाशी न पटणे, गैरसमज, वादविवाद, भांडणे, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी गृहसौख्य लाभणे अशक्य होईल. त्यामुळे स्वत:चे आरोग्यावर अनिष्ट परिणाम होणे संभवते. जपा. दिनांक ४-५ या दोन दिवशी अत्यंत सावधानतेने आचरण करा. अशा परिस्थितीत शुक्राच्या व गुरुच्या अनुकुलतेमुळे काही मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील, व त्यामुळे प्रतिकुल काळ सुसह्य होईल. श्रद्धा असेल तर नियमितपणे दररोज "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल व भावनाप्रधान झाले असावे, असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे. शिवाय सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल व लहरी झाला असावा, असे वाटते. त्यामुळे विचित्र आचरण होणे, अविचाराने खर्च होणे असे घडत असल्याने अकारण मनस्ताप होत असावा, असे दिसते. त्यात स्वत:च्या फ़टकळ बोलण्याने इतरांचा अकारण अपमान होत असावा, असे वाटते. शिवाय महिन्याच्या पूर्वार्धात रवि-मंगळ प्रतिकुल असल्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. काही मंडळीना नेत्रविकाराचा त्रास सहन करावा लागेल. अनपेक्षित खर्च निर्माण झाल्यास आर्थिक चिंता करावी लागेल. जपा. काही मंडळीना आवश्यक अर्थप्राप्तीसाठी कठोर परिश्रम करावे लागतील. शिवाय फ़सवणूक झाल्यास आर्थिक नुकसान होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल. कर्तृत्ववान मंडळींचे वरिष्ठ अधिकारी कौतुक करतील. काहींना बढती, पगारवाढ, अधिकारपद असे काही मिळू शकेल.प्रवासयोग संभवतात. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना तसेच अध्यात्मात रुची असणारांना उपासनेद्वारे महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल, लाभदायक व सुखसमाधान देणारा असाच असल्याचा अनुभव येईल. कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळींकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान

उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ अत्यंत प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. कारण सर्वच ग्रहमान प्रतिकुल असेच असणार आहे. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळीनी स्वत:च्या वर्तमान स्वभावदोषांवर नियंत्रण ठेवले नाही तर अधिकच मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. रवि-मंगळ-शनि पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सर्व प्रकारचे आरोग्य बिघडण्याचीच दाट शक्यता दिसते. वर्तमान अहंकारी व हट्टी स्वभावामुळे अकारण श्रम व दगदग होऊन थकवा येईल. जपा. त्यातून उष्णतेचे विकार बळावतील. घसा, मान, दाढा दुखणे, डोळे तळावणे असे आजार संभवतात. वाढता खर्च आणि त्यात भर म्हणून अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची वेळ येणे संभवते. जपा. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. नोकरी-व्यवसायात अडथळे, पीछेहाट निर्माण होत असल्याचा अनुभव येईल. फ़सवणूक होणेही संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप होईल. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी मन व बुद्धी शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीच्या लेखकांचे साहित्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. प्रवासयोग येतील. पण याच गुरुमुळे भावंडांकडून मनस्ताप दिला जाणेही संभवते. शुक्राच्या अनुकुलतेने महिन्याच्या पहिल्या दहा दिवसांत अपेक्षित कौटुंबिक सुख लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धातया शुक्रामुळे अर्थलाभ देणाऱ्या घटना घडतील. त्यामुळे मनावरील ताण कमी होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि-राहूमुळे मन सतत अशांत व अस्वस्थ राहील. सतत अपेक्षाभंग होतील. एखादा मोठा आजार होणेही संभवते. जपा. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. कुलदैवताची  व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

=====oOo=====